नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०२/२०२६ (शनिवार)

---

## अवघ्या २४ तसाच्या आत बेपत्ता अल्पवयीन मुलीचा घेतला शोध
## केळवद पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद :— पोलीस स्टेशन केळवद येथे दिनांक २६/०२/२०२६ रोजी रात्री केळवद येथील एक अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे बेपत्ता असल्याची तक्रार प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ तक्रारीवरून वरून अप क ९१/२०२६ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांनी सदर अल्पवयीन मुलीचा गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने **अवघ्या २४ तसाच्या आत शोध** घेवुन दिनांक २७/०२/२०२६ सदर मुलगी ही मंडामारा, जि. मंचेरियल, राज्य तेलंगना येथे असल्याची माहीती प्राप्त केली. पोलीस पथकाने तात्काळ सदर ठिकाणी रवाना होवुन नमुद अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले आहे.नमुद मुलगी ही अभ्यासाच्या टेंशन मुळे घरातुन निघुन गेल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ६ मोटर सायकल,५ मोबाईल,रोख रक्कम असा २ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक २७/०२/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा प्रभाग क्र. ३, शिवशक्ती सेलीब्रेशन लॉन च्या मागे, काळे यांचे शेतात रिकाम्या जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) राजेंद्र यादवराव बेलसरे, वय ५३ वर्ष, २) गणेश ज्ञानेश्वर व्यवहारे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, कळमेश्वर ३) आदित्य गंगाधरजी मिलमिले, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. ५ ब्राम्हणी, कळमेश्वर, ४) नणकेश्वर ज्ञानेश्वर उईके, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र १, कळमेश्वर, ५) राजेंद्र रामनाथ शिंदे, वय ४० वर्ष, रा. गजानन मंदीर जवळ, कळमेश्वर** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते रोख रक्कम १७२०/— रूपये, एकुण ५ मोबाईल किंमती ५०,०००/— रूपये तसेच घटनास्थळावरून ६ मोटार सायकल किंमती २,०५,०००/— रूपये, असा एकुण **२,५६,७२०/— रूपयाचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ५१ हजार ५७० रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन नरखेड :— दिनांक २७/०२/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बेलोना शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) पुरूषोत्तम मारोतराव गजभिये, वय ६६ वर्षे, रा. पेठ विभाग नरखेड, २) दिलीप किसनाजी बनाईत, वय ३७ वर्षे, रा. वार्ड नं. १४, मोवाड ता. नरखेड ३) आरोपी नामे गौरव ईंगळे, रा. वरूड ४) हेमंत राठोड, ५) दिनेश थेटे, दोन्ही रा. बेलोना ६) वाजिद, रा. जलालखेडा, ता. नरखेड** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन** किंग डिलक्स कंपनीचे ३२ कॅट प्रत्येकी किंमती ५०/— रूपये एकुण १६००/— रूपये २) रॅडो प्रिमियर कंपनीचे ०५ कॅटचे बॉक्स प्रत्येक किंमती ३३०/— रूपये एकुण १६५०/— रूपये, एक बजाज डिस्कव्हर कंपनीची विनाक्रमांकाची मोटरसायकल किंमती ४०,०००/—रूपये,नगदी ५७०/— रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण किंमती **५१,५७०/— रूपयाचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. पारशिवणी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी :— दिनांक २७/०२/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बनेरा येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) चंदू धनराज भलावी, वय ४० वर्ष, रा. बनेरा त. पारशिवनी २) जयदेव रामचंद्र कुमरे, वय ३७ वर्ष, रा. बनेरा, त. पारशिवनी ३) अंबादास पतीराम भेलावे, वय ६२ वर्ष, रा. सूवरधरा, त. पारशिवनी ४) गणेश रमेश पंधरे, वय ४० वर्ष, रा. सूवरधरा, त. पारशिवनी ५) दिनेश काशीराम भलावी, वय २७ वर्ष, रा. बनेरा, त. पारशिवनी ६) नितेश धनराज भलावी, वय ३५ वर्ष, रा. बनेरा, त. पारशिवनी ७) राजाराम बकाराम कोडवते, वय ५५ वर्ष, रा. कोलितमारा** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन** ५२ तासपत्ते रोख रक्कम ५३९०/— रूपये असा एकूण ५३९०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २७/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ५०६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी क्र. १) भोजराज धनराज पराते, वय ४८ वर्ष, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर २) नितीन राजेष भिसीकर, वय ३४ वर्ष, रा. आर्वी, ता. समुद्रपुर, जि. वर्धा यांचे वर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) राजेश धनराज तागडे, वय ४२ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपूर २) जयराज तुकाराम साहारे, वय ६६ वर्ष, रा. कोच्छी, ता. सावनेर, जि. नागपूर ३) अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५० वर्ष, रा. नागलवाडी, ता. सावनेर, जि. नागपूर यांचे वर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद,**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे विनोद बिसन धनविजय, वय ३७ वर्ष, रा. मोखेबर्डी धापर्ला ता. भिवापुर याचेवर २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे महिला आरोपी हिचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे शैलेंद्र बाला मोहनकर, रा. काचूरवाही, ता. रामटेक याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी क्र. १) रूपेश दशरथ पाटील, वय ३४ वर्ष, रा. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती २) मानिक किसनाजी चवडे, वय ५८ वर्ष, रा. करंजोली, ता. नरखेड, जि. नागपूर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ५५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १२६० मिली देशी दारू असा एकुण ५०६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २८/०२/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी, पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे..

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३३ आरोपी अशा एकुण ६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी, पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २३ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.)**







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने